वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) मा.आयुक्त, यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५
३) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय भोसरी यांच्याकडील दि.१९/१०/२०२० चे पत्र
४) दि.११/११/२०२० चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिक
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/५३१/२०२०
दि.११/११/२०२०

विषय – नियत वयोमानानूसार सेवानिवृत्तीबाबत.
श्री.वाखारे मधुकर नानाभाऊ (सहा.शिक्षक)
सं.क्र.५७४८

आदेश,

श्री.वाखारे मधुकर नानाभाऊ हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहा.शिक्षक या पदावर माध्यमिक शिक्षण विभागात दि.१३/०७/१९८७ रोजी रूजू झालेले आहेत. श्री.वाखारे मधुकर नानाभाऊ यांची जन्म तारीख २५ / १२ / १९६२ अशी असून त्यांच्या वयास दिनांक-२४/१२/२०२० रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्री.वाखारे मधुकर नानाभाऊ यांना ३१/१२/२०२० रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील,त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.वाखारे मधुकर नानाभाऊ यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.तसेच श्री.वाखारे मधुकर नानाभाऊ यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज,घरबांधणी कर्ज,वाहन कर्ज, संगणक कर्ज,घर दुरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम,कामगार कल्याण कर्ज तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही. तसेच इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले विद्यालयाने सादर केले आहेत.भविष्यात इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम श्री.वाखारे मधुकर नानाभाऊ यांना मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील.तसेच त्यांना सेवामात्यत देण्यात आलेले नाही.

सबब,मी शिक्षणाधिकारी,पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८ उपरोक्त वाचले क्र.०२ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतुदी नुसार या आदेशान्वये श्री.वाखारे मधुकर नानाभाऊ (सहा.शिक्षक ) यांना दिनांक - ३१/१२/२०२० रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद श्री.वाखारे मधुकर नानाभाऊ (सहा.शिक्षक) यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,

श्री.वाखारे मधुकर नानाभाऊ (सहा.शिक्षक)
माध्यमिक विद्यालय भोसरी

प्रत:- १) लेखा शाखा
२)प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन)
सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्र. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय भोसरी
२/- पुढील कार्यवाहीसाठी

Scanned with CamScanner